N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** परभणी **P.S.(ठाणे):** नानलपेठ

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0114 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**23/02/2026 21:02

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार
**Time Period (कालावधी):** पहर 4
**Date From (दिनांक पासून):** 23/02/2026
**Date To ( दिनांक पर्यंत):** 23/02/2026
**Time From (वेळेपासून):** 12:03 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 12:16 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 23/02/2026 **Time (वेळ):** 20:34 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 041

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 23/02/2026 20:34 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 02 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** हाटेल रायबा, जिंतुर रोड, ,परभणी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** अल्ताफ अयुब मुलाणी

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1987

**(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ,परभणी,नानलपेठ,परभणी,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ,परभणी,नानलपेठ,परभणी,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**

**(j) Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9423586754

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | नानासाहेब गणपतराव मोखडे | | | 1. जुने आरा मशीन लाईन, हिंगोली,,जुबेर मामु यांचे घरी किरायाणे, जिल्हा समादेशक होमगार्ड ,कार्यालय, परभणी, , नानलपेठ,परभणी,महाराष्ट्र,भारत |
| 2 | माणिक शंकरराव वाढेकर | | | 1. जुना पेडगाव रोड, रायगड नगर, ,परभणी, जिल्हा समादेशक होमगार्ड कार्य,कार्यालय, परभणी, ,नानलपेठ,परभणी, |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | महाराष्ट्र,भारत |
| 3 | ज्ञानोबा उर्फ माउली बाबुराव लटपटे | | | 1. संत जनाबाई नगर, गंगाखेड, जिल्हा समादेशक होमगार्ड कार्या,कार्यालय, परभणी, नानलपेठ,परभणी,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | ज्यात500 रुपये दराच्या 24 नोटा | 12,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

12,000.00

**11. Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दि. 23/02/2026.

मी अल्ताफ अयुब मुलाणी, वय 39 वर्ष, व्यवसाय - नोकरी, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, परभणी. मोनं. 9423586754.

समक्ष पोलीस स्टेशन नानलपेठ, जि. परभणी येथे हजर येवून सरकारतर्फे फिर्यादी होवुन फिर्याद देतो की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, परभणी युनीट येथे नोव्हेंबर 2024 पासुन पोलीस निरीक्षक पदावर कार्यरत आहे.

मुळ तक्रारदार प्रतापसिंह कुशाबा नाईक, वय 37 वर्ष, व्यवसाय - नोकरी, पद पलटण नायक, समादेशक कार्यालय, पाथरी, जि. परभणी. रा. पाटील गल्ली, पाथरी, ता. पाथरी, जि. परभणी यांनी दि. 20/02/2026 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, परभणी येथे लेखी तक्रार दिली की, " मी सन 2011 साली होमगार्ड पदावर हजर झालो होतो. त्यानंतर सन 2014 साली माझी समादेशक कार्यालय, पाथरी येथे अंशकालीन लिपीक पदावर नियुक्ती करण्यात आली होती. तेथे कार्यरत असतांना मला दि. 11/09/2024 रोजी समादेशक कार्यालय, पाथरी येथील समादेशक अधिकारी पदाचा अतिरीक्त पदभार देण्यात आला होता.

समादेशक कार्यालय, परभणी येथील वरिष्ठ पलटण नायक माऊली लटपटे हे माहे डिसेंबर 2025 मध्ये मला भेटले व त्यांनी मला केंद्र नायक मोखडे साहेब यांची भेट घेण्यास सांगीतले. त्यावरून मी समादेशक कार्यालय, परभणी येथे जावुन मोखडे साहेब यांची भेट घेतली. भेटी दरम्यान मोखडे साहेबांनी मला सांगीतले की, "लवकरच पदोन्नती आदेश निर्गमीत होणार आहेत. पदोन्नती आदेश तयार करून त्यावर मा. जिल्हा समादेशक साहेबांच्या सहया घेण्याचे काम माझे आहे. परंतु मी पदोन्नती यादी मध्ये तुझे नाव सामाविष्ट करणार नाही. त्यामुळे तुला पलटण नायक पदाची पदोन्नती मिळणार नाही. " तेंव्हा मी तेथुन बाहेर येवुन वरिष्ठ पलटण नायक माऊली लटपटे यांना फोन लावुन घडलेल्या घटनेबाबत सांगीतले. तेंव्हा लटपटे यांनी मला सांगीतले की, "माझे मोखडे साहेबांशी याबाबत बोलणे झाले आहे. त्यांनी मला सांगीतले आहे की, तु जर त्यांना 40,000/- रूपये दिलेस तर मोखडे साहेब तुझे नाव पदोन्नती आदेशात सामाविष्ट करणार आहेत. " तेंव्हा मी लटपटे यांना थोडे पैसे कमी करण्याची विनंती केली तेंव्हा त्यांनी मला पदोन्नती आदेश प्राप्त झाल्यानंतर 25,000/- रूपये द्यावे लागतील असे सांगीतले. त्यामुळे मी नाईलाजास्तव

होकार दिला. तसेच त्याच दिवशी होमगार्ड कार्यालय परभणी येथील प्रशासिक अधिकारी वाढेकर मला भेटले व त्यांनी देखील मला पलटण नायक पदाची पदोन्नती पाहिजे असल्यास तुला केंद्र नायक मोखाडे साहेब यांना पैसे द्यावे लागतील असे सांगीतले.

दि. 31/12/2025 रोजी मा. जिल्हा समादेशक होमगार्ड, परभणी यांचे आदेशान्वये मला पलटण नायक या पदावर पदोन्नती देण्यात आली. त्यानंतर प्रशासिक अधिकारी वाढेकर आणि वरिष्ठ पलटण नायक माऊली लटपटे हे मला वारंवार भेटुन व फोन लावुन पदोन्नती आदेश निघाल्याने आता ठरल्याप्रमाणे 25,000/- रूपये देण्यास सांगु लागले. त्यामुळे मी दि. 04/01/2026 रोजी सकाळी 09.20 वाजता 8,000/- रूपये फोन पे व्दारे लटपटे यांचे मोबाईल क्रमांक 9850587693 यावर आॅनलाईन पाठवुन दिले. त्यानंतर देखील उर्वरीत पैसे देण्यासाठी लटपटे हे वारंवार मला त्रास देवु लागले. त्यामुळे मी त्यांना 10,000/- रूपयाचा एच.डी.एफ.सी. बॅंकेचा चेक, नाव न लिहीता व दि. 15/02/2026 रोजीची तारीख टाकुन दिला. तसेच त्यांना सांगीतले की, फेबु्रवारी महिण्यात सदर चेक व्दारे 10,000/- रूपये उचलुन घ्या. परंतु सध्या माझे खात्यात पैसे नाहीत त्यामुळे आता वरिष्ठ पलटण नायक माऊली लटपटे हे मला वारंवार भेटुन फोन पे व्दारे दिलेले 8,000/- रूपये व्यतीरीक्त शिल्लक 17,000/- रूपये देण्यास सांगत आहेत.

मला देण्यात आलेल्या पलटण नायक पदाच्या पदोन्नती करीता कोणतीही शासकीय फिस लागत नाही. केंद्र नायक मोखडे साहेब, प्रशासिक अधिकारी वाढेकर आणि वरिष्ठ पलटण नायक माऊली लटपटे हे मला देण्यात आलेल्या पदोन्नती करीता बक्षीस म्हणुन 17,000/- रूपये लाचेची मागणी करीत आहेत. परंतु मला त्यांना लाच देण्याची मुळीच ईच्छा नाही. म्हणुन मी तक्रार देत आहे." वगैरे हस्तलिखीत तक्रार तक्रारदार यांनी दिली आहे.

त्यावरून आम्ही तात्काळ दोन षासकीय पंच नामे 1) खदीर खान हबीब खान पठाण, पद - वाहक, बिल्ला नंबर 22589, राज्य परिवहन महामंडळ, परभणी 2) सय्यद ईमरान सय्यद युनुस, वय 38 वर्ष, पद - वाहक, बिल्ला नंबर 22081, राज्य परिवहन महामंडळ, परभणी यांना उपलब्ध करून घेतले. दोन्ही पंचांची व तक्रारदाराची ओळख करून दिली. तक्रारदाराने पंचाना तक्रारीबाबत तोंडी माहिती दिली. तसेच तक्रारदाराची हस्तलीखीत तक्रार त्यांना वाचावयास दिली. तक्रारदाराच्या तक्रारीवर आम्ही व दोन्ही पंचांनी सहया केल्या. तसेच ला.प्र.वि. कार्यालयात पडताळणी पुर्व कार्यवाही करण्यात आली. त्यानंतर 12.25 ते 14.21 वाजण्याच्या सुमारास करण्यात आलेल्या लाचमागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान तक्रारदार नाईक व पंच क्र. 1 खदिर खान यांना आवश्यक त्या सुचना देवुन व्हाईस रेकाॅर्डरसह लोकसेवक केंद्र नायक मोखडे यांना भेटण्यासाठी होमगार्ड कार्यालय, परभणी व जगदंबा हाॅटेल, जिंतुर रोड, परभणी येथे पाठविण्यात आले.

लाचमागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान होमगार्ड कार्यालय, परभणी येथे झालेल्या भेटीवेळी तक्रारदार यांनी "प्रमोशन झाल न आता आपल... तर साहेबाला भेट असे माऊली लटपटे यांनी सांगीतले होते" असे लोकसेवक मोखडे यांना सांगीतले. तेंव्हा लोकसेवक केंद्र नायक मोखडे यांनी "त्याला दिल नाही का?" असे तक्रारदारास विचारले त्यावेळी तक्रारदाराने "त्याला नाही दिले न त्याला" असे सांगीतले. तेंव्हा लोकसेवक मोखडे यांनी "त्याला देवुन टाकायच न ... त्याच्याहुन काय नाही आपण कयाला अडकुन ठेवायच उगच" असे सांगीतले. तसेच तक्रारदार पंचासह परत येत असतांना तक्रारदारास फोन करून जिंतुर रोड वरील जगदंबा हाॅटेलमध्ये येण्यास सांगीतले. तक्रारदार पंचासह जगदंबा हाॅटेल, जिंतुर रोड, परभणी येथे गेले. तेथे लोकसेवक केंद्र नायक मोखडे तक्रारदारास "जे हाय ते देऊन टाकायच त्याल" असे म्हणाले. तेंव्हा तक्रारदाराने "किती द्यायचे मग" असे विचारले असता त्यांनी "तेन किती म्हणल" असे विचारले तेंव्हा तक्रारदाराने "तेला म्या पहिले आठ हजार देल्याले हेत फोन पे वर" असे सांगीतले. तेंव्हा मोखडे यांनी पुन्हा "त्यानी म्हणला किती" असे विचारले. तेंव्हा तक्रारदाराने "ते मला पंचवीस म्हणायलय" असे सांगीतले. तेंव्हा लोकसेवक मोखडे "मग बरोबर हयन तेवढेच सांगितले काई कमी जास्त" असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदाराने "नाई सर पंचवीस हजार जास्त व्हायलेत न सरं", " पैषाची लय अडचण चालू हे...ते म्हणल सर... तेच्यात कमी जास्त" असे सांगीतले. तेंव्हा लोकसेवक मोखडे यांनी "हं...जास्त म्हणाल तर मग पाच जास्त द्या .... तीस द्या... पंधरा-पंधरा घेता आम्ही दोघजण.... हो वाढेकर साहेब" असे म्हणाले. तेंव्हा प्रशासिक अधिकारी वाढेकर " हो जमतय तस... काय आनंदान" असे म्हणाले. तसेच लोकसेवक मोखडे यांनी तक्रारदारास उद्देशुन हाॅटेलचे बिल द्याव लागत न असे म्हणाले असता प्रशासिक अधिकारी वाढेकर यांनी "पाच हजार घेऊन ठेवायचे तोपर्यंत" असे सांगीतले. तसेच प्रशासिक अधिकारी वाढेकर यांनी तक्रारदारास उद्देशुन "आतापर्यंत त्याला फक्त आठच देले." असे म्हणाले असता तक्रारदाराने "हो न" असे म्हणाले. त्यावर प्रशासिक अधिकारी वाढेकर यांनी "मला वाटल जास्त दिले काय की" असे तक्रारदारास म्हणाले. त्यानंतर काहीवेळ चर्चा केल्यानंतर लोकसेवक मोखडे यांनी तक्रारदारास "त्याला काय करा तुम्ही आठ देले न.... अजुन बारा द्या" असे म्हणाले. तेंव्हा तक्रारदाराने त्यांना "बारा हजार देऊ का" असे विचारले असता लोकसेवक मोखडे "ठिकय" असे म्हणाले.

लाच मागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान तक्रारदार नाईक, लोकसेवक केंद्र नायक मोखडे व प्रशासिक अधिकारी यांचे संभाषण डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डरच्या सहाय्याने ध्वनिमुद्रीत करण्यात आले आहे. लोकसेवक केंद्र नायक मोखडे आणि प्रशासिक अधिकारी वाढेकर यांनी तक्रारदार प्रतापसिंह नाईक यांना देण्यात आलेल्या पलटण नायक पदाच्या पदोन्नती करीता बक्षीस म्हणुन सुरूवातीस 25,000/- रूपये सांगुन 8,000/- रूपये फोन पे व्दारे वरिष्ठ पलटण नायक लटपटे याला पाठवल्याचे मान्य करून तडजोडअंती 12,000/- रूपये लाचेची मागणी करून लाच रक्कम वरिष्ठ पलटण नायक लटपटे यांच्याकडे देण्यास सांगीतल्याचे निष्पन्न झाले. तसा सविस्तर लाच मागणी पडताळणी पंचनामा करण्यात आला आहे.

पडताळणी कार्यवाही दरम्यान लोकसेवक मोखडे यांनी तक्रारदारास लाच रक्कम वरिष्ठ पलटन नायक लटपटे यांना देण्यास सांगीतल्याने व लटपटे हे बाहेरगावी गेलेले असल्याने सापळा कार्यवाही तक्रारदार यांचे सांगणेप्रमाणे दि. 23/02/2026 रोजी करण्याचे सर्वानुमते ठरवण्यात आले.

आज दिनांक 23/02/2026 रोजी सकाळी तक्रारदार नाईक व दोन्ही पंच ला.प्र.वि. कार्यालयात हजर आले. दि. 20/02/2026 रोजी लाच मागणी पडताळणी कार्यवाही वेळी लोकसेवक केंद्र नायक मोखडे व प्रशासिक अधिकारी यांनी 12,000/- रूपये लाचेची मागणी केल्याने तक्रारदाराने एकुण 12,000/- रू ज्यामध्ये 500/- रूपये दराच्या 24 चलनी नोटा लाच म्हणुन देण्याकरीता पंचासमक्ष हजर केल्या. सापळा कार्यवाही दरम्यान तक्रारदार, पंचांना व सापळा पथकास प्रत्येकाच्या कामाबाबत आम्ही सुचना दिल्या. तसेच अॅंथ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायलेट लॅम्पचे गुणधर्म व वापरा बाबत माहिती देवून त्याचे प्रात्यक्षीक करून दाखविण्यात आले. लाचेच्या 12,000/- रू रकमेस अॅन्थ्रासीन पावडर लावून ती रक्कम तक्रारदार नाईक यांच्याकडे देवून व्हाईस रेकाॅर्डरसह तक्रारदार नाईक व पंच क्र. 1 खदिर खान यांना वरिष्ठ पलटण नायक लटपटे यांना लाचेची रक्कम देण्यासाठी पंच क्र. 1 यांचे मोटार सायकलने पाठविले. त्यांचे पाठोपाठ सापळा पथक आवश्यक किट साहित्यासह मोटारसायकलने निघाले.

तक्रारदार नाईक व पंच क्रमांक 01 खदिर खान असे मोटार सायकलने विसावा फाटयाच्या अलिकडे जिंतुर रोडवरील रायबा हाॅटेल मध्ये गेले. सापळा कार्यवाही दरम्यान तक्रारदार नाईक व वरिष्ठ पलटण नायक लटपटे यांची पंच क्र. 1 खदिर खान यांच्या समक्ष भेट झाली. भेटी दरम्यान वरिष्ठ पलटण नायक लटपटे यांनी तक्रारदार नाईक यांच्याकडुन 12,000/- रू लाच रक्कम स्वतः स्विकारली आणि तक्रारदारास "किती हेत" असे विचारले. तेंव्हा तक्रारदाराने "बारा हजार हेत" असे सांगीतले. तेंव्हा वरिष्ठ पलटण नायक लटपटे यांनी "राईट" असे म्हणुन 12,000/- रूपये लाच रक्कम स्वतःच्या पॅन्टीचे उजव्या खिश्यात ठेवुन दिली. वरिष्ठ पलटण नायक लटपटे यांनी लाच रक्कम स्विकारताच पंच क्र. 01 खदिर खान य़ांनी हाॅटेल बाहेर येवुन सापळा पथकास दिसेल अषा प्रकारे पुर्वनियोजीत इशारा केला. तो इषारा पाहून सापळा पथकातील सर्व स्टाफ तेथे आले व वरिष्ठ पलटण नायक लटपटे यांना ताब्यात घेतले. तसेच त्यांना हाॅटेलमधील एका रूममध्ये नेण्यात आले.

तेथे स्वतःची ओळख सांगुन लोकसेवकास त्याचे पुर्ण नाव गाव विचारले असता त्याने त्यांचे नाव ज्ञानोबा (माऊली) बाबुराव लटपटे, वय 49 वर्ष, पद - वरिष्ठ पलटण नायक, जिल्हा समादेशक होमगार्ड कार्यालय, परभणी, राहणार रवि मुंढे यांचे घर, गोल्डन इंग्लीश स्कुलच्या बाजुला, संत जनाबाई नगर, गंगाखेड, ता. गंगाखेड, जि. परभणी असे सांगितलेे. तसेच त्यांना केंद्र नायक मोखडे आणि प्रशासिक अधिकारी वाढेकर यांच्याबद्दल विचारले असता त्यांनी ते पोलीस अधिक्षक कार्यालय, परभणी येथे गेले असल्याचे सांगीतले. तेंव्हा आम्ही श्री. राहुल तरकसे, पोलीस उप अधिक्षक, ला.प्र.वि. परभणी यांना फोन व्दारे सदर बाबत माहिती देवुन केंद्र नायक मोखडे आणि प्रशासिक अधिकारी वाढेकर यांना ताब्यात घेण्याबाबत कळविले.

त्यानंतर वरिष्ठ पलटण नायक लटपटे यांना पंचासमक्ष लाचेच्या रकमेबाबत विचारणा केली असता त्यांनी ते त्यांच्या पॅन्टच्या समोरील उजव्या खिष्यात असल्याचे सांगीतले. त्यावर आम्ही सांगितलेवरून त्यांनी खिषातुन लाच रक्कम 12,000/- रूपये बाहेर काढली. सदर 12,000/- रूपयांच्या  व लटपटे यांच्या दोन्ही हातावर पंचासमक्ष अॅल्ट्राव्हायलेट लॅम्पचा प्रकाष टाकला असता नोटांवर व उजव्या हातांच्या बोटांवर हिरवट रंगाची चकाकी दिसून आली. त्यानंतर दोन्ही पंचांनी नोटांचे नंबरची पडताळणी केली असता ती लाचेची रक्कम असल्याची खात्री झाली आहे. सदरची लाच रक्कम पंचासमक्ष जप्त करण्यात आली आहे. तसेच सापळा कार्यवाही दरम्यान तक्रारदार नाईक आणि वरीष्ठ पलटण नायक लटपटे यांचे दरम्यान झालेले संभाषण डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डरव्दारे ध्वनिमुद्रित करण्यात आले आहे. ध्वनिमुद्रीत संभाषण असलेले मेमरीकार्ड पंचासमक्ष जप्त करण्यात आले आहे. तसेच वरिष्ठ पलटण नायक लटपटे यांचे अंगावरील पॅन्ट जप्त करण्यात आली आहे. तसा सविस्तर सापळा पंचनामा करण्यात आला आहे. तसेच श्री. राहुल तरकसे, पोलीस उप अधिक्षक, ला.प्र.वि. परभणी यांनी लोकसेवक 1) नानासाहेब गणपतराव मोखडे, वय 55 वर्ष, पद - केंद्र नायक, जिल्हा समादेशक होमगार्ड कार्यालय, परभणी, राहणार जुबेर मामु यांचे घरी किरायाणे, जुने आरा मशीन लाईन, हिंगोली, ता.जि. हिंगोली. 2) माणिक शंकरराव वाढेकर, वय 50 वर्ष,

प्रशासिक अधिकारी, जिल्हा समादेशक होमगार्ड कार्यालय, परभणी, राहणार जुना पेडगाव रोड, रायगड नगर, परभणी यांना पोलीस अधिक्षक कार्यालय, परभणी येथुन ताब्यात घेतले.
दि. 20/02/2026 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, परभणी येथे तक्रारदार नाईक यांनी दिलेल्या तक्रारीवरून पंचासमक्ष करण्यात आलेल्या लाच मागणी पडताळणी कार्यवाही वेळी हा◌ॅटेल जगदंबा, जिंतुर रोड, परभणी येथे लोकसेवक केंद्र नायक मोखडे आणि प्रशासिक अधिकारी वाढेकर यांनी तक्रारदार प्रतापसिंह नाईक यांना देण्यात आलेल्या पलटण नायक पदाच्या पदोन्नती करीता बक्षीस म्हणुन सुरूवातीस 25,000/- रूपये सांगुन 8,000/- रूपये फोन पे व्दारे वरिष्ठ पलटण नायक लटपटे याला पाठवल्याचे मान्य करून राहिलेल्या रक्कमेपैकी तडजोडअंती 12,000/- रूपये लाचेची मागणी करून लाच रक्कम वरिष्ठ पलटण नायक लटपटे यांच्याकडे देण्यास सांगीतले. त्यानंतर दि. 23/02/2026 रोजी करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान हा◌ॅटेल रायबा, जिंतुर रोड, परभणी येथे वरिष्ठ पलटण नायक लटपटे यांनी तक्रारदाराकडुन पंचासमक्ष 12◌ः16 वाजण्याच्या सुमारास 12,000/- रूपये लाचेची रक्कम स्वतः स्विकारली आहे. म्हणून माझी 1) नानासाहेब गणपतराव मोखडे, वय 55 वर्ष, पद - केंद्र नायक, जिल्हा समादेशक होमगार्ड कार्यालय, परभणी, राहणार जुबेर मामु यांचे घरी किरायाणे, जुने आरा मशीन लाईन, हिंगोली, ता.जि. हिंगोली. 2) माणिक शंकरराव वाढेकर, वय 50 वर्ष, प्रशासिक अधिकारी, जिल्हा समादेशक होमगार्ड कार्यालय, परभणी, राहणार जुना पेडगाव रोड, रायगड नगर, परभणी 03) ज्ञानोबा बाबुराव लटपटे, वय 49 वर्ष, पद - वरिष्ठ पलटण नायक, जिल्हा समादेशक होमगार्ड कार्यालय, परभणी, राहणार रवि मुंढे यांचे घर, गोल्डन इंग्लीश स्कुलच्या बाजुला, संत जनाबाई नगर, गंगाखेड, ता. गंगाखेड, जि. परभणी यांचे विरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 चे कलम 7 अन्वये कायदेशीर फिर्याद आहे.

फिर्याद दिली सही

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
~~Manoj Pundlik Surwade~~ D.Y.S.P. Rahul Tarkase.
**Rank** (पद): I (Inspector) **No.**(क्र.): PBMH88708
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

ASI
पोलीस ठाणे अमलदार
पो.स्टे. नानलपेठ, परभणी

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Ganesh Narayan Ka
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): POBN84037